## प्रेस नोट

दि.१०/०१/२०२४

उल्हासनगर महानगरपालीका येथील प्रभारी मुकादम, संजय धाकु पेडामकर यांना लाच स्विकारतांना ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| ॲन्टी करप्शन ब्युरो/घटक | :— | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :— | हिललाईन पोलीस स्टेशन, ठाणे शहर<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र. ३६/२२.५० वा. दि.१०.०१.२०२४ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :— | संजय धाकु पेडामकर वय:— ५४ वर्षे, पद:— प्रभारी मुकादम, प्रभाग क्र.४, उल्हासनगर महानगरपालीका, उल्हासनगर जि.ठाणे (वर्ग— ४) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :— | २५००/—रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :— | २०००/—रू. |
| थोडक्यात हकीगत | :— | दिनांक १०.०१.२३ रोजी यातील तक्रारदार यांना उल्हासनगर नं. ५ परिसरात एकुण चार अनधिकृत शोरमा विक्रीच्या गाडया चालु ठेवण्याकरीता ३०००/—रू. लाचेची मागणी करून यापुर्वी ५००/—रू. स्विकारून उर्वरीत २५००/—रू. तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून दिनांक १०/०१/२०२३ रोजी घेवुन येण्यास सांगीतले.<br>परंतु तक्रारदार यांना लोकसेवक संजय यांना लाच दयावयाची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/०१/२०२४ रोजी लोकसेवक संजय हे ३०००/—रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १०/०१/२०२४ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक यांनी तडजोडीअंती २५००/—रू. लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन यापुर्वी स्विकारलेले ५००/—रू. वगळुन २०००/—रू. स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यांनतर लगेचच लाचेच्या सापळयाचे आयोजन केले असता, लोकसेवक संजय यांना कैलाश कॉलनी चौक, उल्हासनगर नं. ५ याठिकाणी तक्रारदार यांचेकडून रु. २,०००/— (दोन हजार रुपये) इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले असून लाचेची रक्कम लोकसेवक यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी— मा.श्री.सुनिल लोखंडे, सो. पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा.श्री.अनिल घेरडीकर सो. अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :—लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई—मेल आयडी :—spacbthane@mahapolice.gov.in
४) ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :— १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :—०२२—२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(स्वप्निल जुईकर)
पोलीस निरीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, ठाणे.